# वर्तमान समाजामध्ये समाजसुधारक संत गणपती महाराजाचे विचार

प्रा. डॉ. प्रभापती वा. विहिरे
स्व. मदनगोपाल मुंधडा महाविद्यालय
चंदूर रेल्वे जि. अमरावती.

२१व्या शतकातील कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा चेहरा बदलत जाऊन पाश्चात्य आचार विचारांच्या अंधानुकरणामुळे समाजाची आजची दिशा अंधकाराकडे प्रवास करीत आहे. त्याचबरोबर जात, धर्म, विषमता अन्य बाबतीत मोठ्या प्रमाणामध्ये संघर्षाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. तेव्हा अशा काळामध्ये गणपती महाराजाचे सामाजिक एकोप्याचे विचार कुटुंब, समाज व राष्ट्राला शांतता, एकात्मता, सर्वधर्म समभावाकडे नेऊन समाजिक एकोपा निमार्ण करुन वर्तमान माणसाला नवा चेहरा देतात.

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये वारकरी संप्रदायाबरोबर नाथ, भागवती विचारांचा वाटा आहे. मात्र गणपती महाराजांनी कीर्तना सारख्या प्रकारातून फक्त आध्यात्मिक प्रबोधन घडवून न आणता काळानुसार वर्तमान जगण्यातील समाज परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून विचारांची मांडणी केली आहे. त्यामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या विचारांना आदर्श मानून नवसमाज निर्मितीसाठी गणपती महाराज प्रयत्न करतात. शिक्षण, आरोग्य, समानता, स्वातंत्र्य, सामाजिक एकोपा, धार्मिक सहिष्णुता, आंतरजातीय विवाह आदी जीवनमूल्यात्मक समाज परिवर्तनवादी विचाराची मांडणी त्यांनी आपल्या अभंग रचनेतून केली आहे. या बाबी खालील विवेचनातून दिसून येतात.

**१. आधुनिक तंत्रज्ञानात्मक संत गणपती महाराजांचे विचार :—**

महाराजांनी पुस्तकी शिक्षणाला महत्व दिले नाही. जीवनोपयोगी शिक्षणच विद्यार्थ्यांना लाभावे ही त्यांच्या अंतरीची इच्छा होती. श्रमप्रतिष्ठा, कष्ठप्रतिष्ठा, नवे संशोधन या गोष्टी वैचारिक परिवर्तनाबरोबर त्यांच्यात आल्या की, त्याच्यावर लादण्यात येणारी आर्थिक गुलामगिरी व तिचे भय नष्ट होईल. व ते सवार्थाने निर्भय होतील. निर्भयता हीच ख—या स्वरुपात परिवर्तन घडविणारी व समाज जीवनात समाजवादाची नांदी वाजविणारी बाब आहे. विद्यार्थ्यांना शाळा—महाविद्यालयातून कोणत्या प्रकारचे शिक्षण मिळावे याविषयी संत गणपती महाराज म्हणतात —

मंत्रज्ञान, तंत्रज्ञान। जंत्रज्ञान।
ज्ञानच ज्ञान सालीम।।
आगगाडया करण्याचे । मोटार बनविण्याचे।।
कळीच्या तेल घाणीचे। जीनाचे, मिलाचे ज्ञानच।।
तार—मास्तरकीचे। शास्त्रास्त्र विमानाचे।।
सुतारकीचे, बेलदारीचे। कलादारीचे ज्ञानच।।
सुतारकीचे, बेलदारीचे। कलादारीचे ज्ञानच।।
लोडे—वस्त्र शिलाईचे। नाटके तयार करण्याचे।।
गायन वादन शिकण्याचे। तमाशाचे ज्ञानच।।
काच—भांडी तयार करण्याचे। धातू शोधून काढण्याचे।।
हॅट्रीक्स सफाईचे। शेतकी ज्ञानच।।
सुया तयार करण्याचे। आगडब्याचे, साबणाचे।।
हात सूत काढण्याचे। सटलाचे ज्ञान।

संत गणपती महाराजांनी ग्रामीण तथा शहरी जीवनाला आवश्यक असलेल्या शिक्षण प्रणालीचा उल्लेख इथे केला आहे. आजही शहरी व ग्रामीण शिक्षण वेगळे असून ते जीवनपयोगी असावे असे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. शिक्षण हे रोजगाराभिमुख असले पाहिजे तसेच समाजभिमुख असणे आवश्यक आहे. त्याशिवाय जीवन—शिक्षण व समाज एका सरळ रेषेत येणार नाही. समाजाला एका पातळीवर घेऊन येणारी बाब म्हणजे शिक्षण आहे.

**२. आजच्या ढोंगी, मतलबी स्वार्थी साधूवर प्रहार करुन समाजाला नवविचार स्वीकारण्यास संत गणपती महाराज प्रवृत्त करतात :—**

समाजात समाजाला लुबाडण्याच्या अनेक घटकांपैकी श्बुवाबाजीश एक होय. अंगात देवी येणे, देव संचारणे, गळयात अनेक देवतांच्या मूर्ती अटकवून गावभर फिरणे याचा उद्देश पैसा गोळा करणे हाच असतो.

अंधश्रद्धाळू लोकांना धर्माच्या नावाखाली बुवाबाजी लोकांमध्ये भयगंड निर्माण करतात. त्यांना फसवितात. लुबाडतात अशा लोकांचा संत गणपती महाराज धिक्कार करतात. बहुजनांना सावध राहण्याचा सल्ला देतात.

कोणी देवता गृहात मांडली
लोक दाखविती कारण
उत्सवाचे मिसे द्रव्य जमिविती
प्रपंच करीती त्याचा व्यय
ग्रामोग्रामी जाती इच्छा धरोनिया
अर्थ जमवाया गाडग्यात
गण्या म्हणे धिक्कार त्याचे जीवन
बुडाले संसारी जाणावे ते

किंवा

कोणी चिंध्या पांघरती। कोणी दंड वाजविती
कोणी धुपारणे हाती। घेऊनी ग्रामात फिरती
कोणी कवडयांच्या माळा। घालोनि फिरता गळा
भक्त भव गाठी नसता। सायास हा गेला वृथा
गण्या म्हणे शुद्ध भाव। पाहिजे मिळवाया देव।।[३८]

चमत्काराचा निषेध व्यक्त करताना संत गणपती महाराज म्हणतात —

परमात्मा लिन जया आहे होणे । तेणे हे गा—हाणे ऐकून नये

ख—या तत्वी नाही कोणी चमत्कार। निष्क्रिय ईश्वर गण्या म्हणे।।

**ढोंगी साधुसंत :—**

साधूसंताचा करुन वेश पांघरुन कोणालाही साधू संत बनता येत नाही. त्यासाठी वैराग्य प्राप्त करावं लागतं. थोडया वेळेचा वैताग म्हणजे वैराग्य नव्हे. त्यासाठी साधना करावी लागते. समाजात पैसा कमविण्यासाठी काही लोक कोणत्याही वाईट मार्गांचा अवलंब करतात. भोळी जनता त्यात फसल्या जाते. त्यांची लुबाडणूक होते. त्याच्या दारिद्रियात भर पडते. अशा लोकांपासून सावध राहा असा सल्ला गणपती महाराज जनतेला देतात.

वटाचा रुचिक लावोनिया जटा
करताती फेटा त्याचाची तो
गुडाखू मदत अफू व चरस
तंबाखू भांगेस कमी नाही
बहु लोक मग व्यसनाचे मिसे
येताती सायाचे त्यांचे पाशी
नशा पिऊनिया लहरीत जन
सहज येऊनी जागी मग
गण्या म्हणे त्यांच्या पासोनिया धन
घेतो तो काढून ढोंगी साधु।।

हे ढोंगी साधु—संत म्हणजे ढोंगी बगळे. ते अनेक व्यसनाचे दास असतात. लोकं अशा व्यक्तीजवळ व्यसनाच्या तृप्तीसाठी जातात. भांग, अफू, चरस, गांजा आदींची नशा चढल्यावर ते भक्ताजवळील धन काढून घेतात. त्यांना निर्धन करतात. साधुसंता सारखे वरवर दिसणारे हे लोक दुर्गुणांचे आगर असतात. ते अनेक प्रकारचे प्रयोग करतात. अंगाला राख फासणे, गांजाची चिलीम ओढणे, मग मनात आले तसे ओलणे. यातील बहुसंख्य लोक आपले खरे स्वरुप लोकांच्या लक्षात येऊ नये म्हणून परमेश्वराच्या नावाचा गजर करतात. काही साधू फासावर झोपतात, निखा—यावरुन चालतात, धुपारे घालतात, लिंबू फोडतात, शुभ—अपशकूनाचा खेळ मांडतात, पाण्यावरुन चालून आपलं सामर्थ्य लोकांना दाखवितात. काही रानावनात जाऊन गिरी—कंदरी राहतात. झाडाचा पाला खातात. हे भक्तीचे खरे स्वरुप नाही. भक्तीचा खरा मार्ग नाही. स्वत: जळणे अन् दुस—यांना जाळणे ही भक्ती नाही हे सर्व भक्तीचे ढोंग आहे.

खरे ज्ञान मिळविणे जया। सोंग ढोंग कासया तया
नको फासावरी लोळणे। नको निराहारी होणे
नको खाऊनी राहणे पाला। नको राखड अंगाला
नको घुमारे मांडणे। नको शकून सांगणे
नको चमत्कार दावणे। नको पाण्यावरी चालणे
नको हस्त चुकविणे। नको तुंब्या हाती घेणे
जैशी स्थिती तैसे राहावे। नाम स्मरण करावे
गण्या म्हणे नामासाठी। धरीली शिवे स्मशान वटी।।

असे पुष्कळसे ढोंगी लोक समाजात असतात. त्यांच ढोंगीपणा जोपर्यंत समाजाच्या लक्षात येत नाही. तोपर्यंत ते समाजाची पिळवणूक करुन पैसा मिळवितात. पैसा मिळविणे हाच त्यांचा उद्योग असतो. एक ढोंग उघडकीस आल्यावर ते दुसरे ढोंग घेतात. हेच त्यांचे कर्म असते. ते परमेश्वराजवळ जाऊ शकत नाही. त्यांचा निषेध करताना संत गणपती महाराज म्हणतात—

गाजरांची पुंगी केली। वाजलीया बहू चांगली

नाहीतर टाकली खाऊन। लाभ झाला दोहीकडून
तैसे कामा माजी बहुत। ढोंगी निवडले संत
पैशासाठी हा उद्योग। उचलले साधू सोंग
जोवरी चाले हा व्यापार। वर्तनी करती बरोबर
नाही तरी हिजडयाचे? आणताती सोंग साचे
गण्या म्हणे असे सोंगी। कैसे मिळती पांडुरंगी।

आपल्या किर्तनातून अशा बुवाबाजीच्या मागे लागू नका. हाच संदेश संत गणपती महाराज लोकांना देत असत.

**३. हिंदू—मुस्लिम धर्मामध्ये एकोपा निर्माण करण्यासाठी संत गणपती महाराजांनी मांडलेले विचार :—**

धर्म हे मनुष्यनिर्मित असून ते मानवात भेद निर्माण करतात. धर्मामुळे मानवा मानवात दुरावा निर्माण होतो. धर्मामुळे मानवात विषमता, राग व लोभ निर्माण होतात. धर्माच्या नावाखाली दंगे माजविण्यात येतात. त्यात सामान्य जनता भरडली जाते. समाजातील हिंदू व मुसलमान लोकांनी एकोप्याने राहावे यासाठी गणपती महाराजांनी आपल्या कीर्तनातून लोकांचे उद्‌बोधन केले.

हे मुसलमान बंधू हो। भेद वृत्तीचा सोडला हो ।।
एक दिन तो है मरना। फिर घमेंड कायकू करना
तुम हम प्रेमसे रहना। देखके चलना अच्छा रहा
जे सिद्ध ग्यानी होता। भ्रम कर्म मे नही गिरता ।।

कोणत्याही धर्माची मूलतत्व एक आहे. तेव्हा धर्माच्या खोटया समजूतीसाठी वार करण्यात अर्थ नाही. मानवता हाच खरा धर्म. मानवाचा मूळ जो मानवधर्म आहे त्यांची सेवा अभेदत्वाने सर्वांनी करावी असा प्रचार करुन त्यांनी हिंदू—मूसलमानात ऐक्यांची भावना निर्माण केली.

**४. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यात खर्चिक विवाह पद्धती हे एक कारण आहे. त्या अनुषंगाने संत गणपती महाराजांचे विचार —**

समाजिक प्रतिष्ठेसाठी कर्ज काढून लग्न करणे हे संत गणपती महाराजांना अजिबात मान्य नव्हते अशा गरीब लोकांना त्यांनी धारेवरच धरले आहे. ते म्हणतात—

गरीब लोक जे आहेत। ते लग्नाच्या कर्जात
शेवटी मरुन जातात। नाही फिटत ते।।

लग्नासाठी कर्ज काढणे मुर्खपणाचे आहे. प्रतिष्ठेपेक्षा अत्यंत कमी खर्चात लग्न करावे. लग्न हे दोन मनाचे मिलन आहे तेव्हा —

लग्न कार्यालागी वित्त। खर्चू नये बहूत
व्हावे ते थोडक्यात खर्चात । सुपद्धत ही होय।।

अशा प्रकारे बहुजन समाजाला उद्‌बोधन करुन खर्चीक विवाह पद्धती व प्रतिष्ठा या विषयी समाजाची मानसिकता बदलविण्याचा प्रयत्न करतात

५. विद्येचे महत्व सांगताना संत गणपती महाराज म्हणतात—

विद्या जास्त मातेहुनीया। आहे दया करणारी
परदेशी जात माय। धरुनीया करीत काय
विद्याच तेथे साह्‌य करी। विद्या गाय कामधेनू
विद्या जाळीते अज्ञान। वाढविते शुद्धज्ञान ।।

समाजात मानवता धर्म जगविण्यासाठी विद्येचा प्रसार व प्रचार बहुजन समाजात होणे ही आवश्यक बाब आहे. मातेपेक्षाही विद्येचे महत्व संत गणपती महाराजांना अधिक वाटते. ते पटवून दाखविताना ते म्हणतात, परदेशात गेल्यानंतर आई सोबत येत नाही तर तेथे विद्याच मदतीला येते. शुद्धज्ञान मिळते. विद्या ही कामधेनू आहे. विद्येमुळे अज्ञान नष्ट होते. शुद्धज्ञान मिळते.

जनतेस पुन्हा स्त्री, शूद्ध—अतिशूद्रांना शिक्षणाचे दरवाजे उघडे झाले पाहिजे हा गणपती महाराजांचा आग्रह होता. वरिष्ठांना, उच्च वर्णियांना शिक्षण दिले की, ते झिरपूर खाली येईल या मताला महाराजांनी खडसून विरोध केला. धिक्कार केला. महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या शैक्षणिक चळवळीच्या पाठीमागे असलेल्या विचाराला त्यांनी उचलून घेतले. फूल्यांचे शिक्षणाचे क्षितीज अत्यंत विशाल होते. ब्राम्हण पांढरपेशापलीकडे शूद्र अतिशूद्र आणि स्त्रियांपर्यंत विस्तारले होते. तोच धागा गणपती महाराजांनी पकडलेला होता. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा. शिक्षण जीवनोपयोगी असावे. कनिष्ठ वर्गातून शिक्षक तयार व्हावे अशा मौलिक सूचना हंटर आयोगास म. ज्योतिरावांनी केल्यात. त्याचा पाठपुरावा गणपती महाराजांनी केला. बहुजन समाजविषयीची त्यांची कळकळ व तळमळ ज्योतिबांच्या विचाराला जाऊन भिडणारी होती. पण बहुजन समाजाला शिक्षणाविषयीची गोडी निर्माण झाली नव्हती. त्यांना विद्येविषयी, शिक्षणाविषयी समजावून सांगण्यासाठी संत गणपती महाराज ग्रामखेडयात फिरले व शिक्षणाचा प्रचार केला.

अशाप्रकारे आपल्या अभंगरचनेतून व कीर्तनाद्वारे समाजसुधारक गणपती महाराज आपले विचार बहुजनांपर्यंत

पोहचवत होते. नविन समाज हा निकोप असावा त्यातच राष्ट्रहीत आहे याची जाणीव त्यांना होती.

**निष्कर्ष :—**

समाजसुधारक गणपती महाराजांचे विचार काळानुसार परिवर्तनवादी आहेत.

- समाजाला नवीन दृष्टी देऊन नव समाजनिर्मितीसाठी मोलाचे ठरतात.
- शिक्षणाचे महत्व सर्वांनी जाणून घेऊन सर्व समाज साक्षर व सुशिक्षित होऊन राष्ट्रहीत
- साधल्या जावे ही त्यांची तळमळ होती.
- सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीकोणातील त्यांचे विचार आजच्या समाजिक उभारणीसाठी
- आवश्यक आहेत हे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१. अभंगवाणी भाग १ — संत गणपती महाराज
२. अभंगवाणी भाग २ — संत गणपती महाराज
३. समाजसुधारक गणपती महाराज — लेखक बाळ पदवाड
४. सहर्जासिद्धानुभव पूवार्ध — संत गणपती महाराज.